स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठनांदेड,
मानव विज्ञान शाखेअंतर्गत विषयातील 'राज्यशास्त्र'(पीएचडी.)
पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग : एक चिकित्सक अध्ययन"

संशोधक

प्रमोद प्रकाशराव राऊत

एम.ए,सेट राज्यशास्त्र

मार्गदर्शक

डॉ. पांचाळ ए. बी.
एम.ए, पीएचडी.
सहायक प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक

राज्यशास्त्र विभाग

शारदा महाविद्यालय,परभणी.

संशोधन केंद्र

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.

ऑगस्ट 2023

===

“परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग : एक चिकित्सक अध्ययन”

विषयाचे महत्त्व :

“परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग:एक अभ्यास” या विषयाच्या अनुषंगाने महत्त्व विशद करीत असताना राजकारणात महिलांचा सहभाग हा विषय महत्त्वाचा असून स्त्री पुरुष समानता या तत्त्वाला अनुसरून आहे. त्यामुळेच भारतीय संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कलम २४३T(टी)अन्वये ३३% आरक्षण ७३व७४घटना दुरुस्तीअन्वेये१९९२ ला देण्यात आले. तर त्या दुरुस्ती करून २००९ साली ३३% वरून ५०% नेण्यात आले. “परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सहभाग: एक अभ्यास”हा विषय घेताना वरील संविधानिक बाब अतिशय महत्त्वाची वाटत वाटत असल्याने प्रस्तुत विषय मी संशोधनासाठी घेतलेला आहे.

समस्या सूत्रण :

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्ताविकेमध्ये दर्जाची व संधीची समानता प्रस्थापित करणे हे भारतीय संविधानाचे मुख्य उद्देश दर्शविण्यात आला आहे.त्यामुळे भारतीय शासन व्यवस्थेच्या स्त्री-पुरुषांना समान संधी देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे.”परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास” हा संशोधन विषय घेत असताना भारतीय इतिहास पाहता महिलांचा सक्रिय सहभाग आपणास दिसून येतो उदाहरणार्थ रजिया सुलतान,नूरजहान,राजमाता जिजामाता,अहिल्याबाई होळकर,झाशीची राणी व महाराणी ताराबाई इत्यादीविषयाच्या अनुषंगाने सांप्रत कालखंडातील परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिलांची परिस्थिती पाहता त्यांची भूमिका काय आहे?परभणी जिल्ह्याच्या राजकारणात महिलांची वाटचाल कशा पद्धतीने होत गेली ? परभणी जिल्ह्यातील राजकारणात प्रत्यक्ष निवडणुकीतील महिलांचा सहभाग आहे का?परभणी जिल्ह्यातील महिलांचा कार्यात्मक आढावा कशा पद्धतीचा आहे ? परभणी जिल्ह्याच्या विकासात महिला लोकप्रतिनिधींचा वाटा आहे का?इत्यादी अनेक प्रकारच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी .”परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास”हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे

संशोधन विषयाची आवश्यकता:

”परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास” या संशोधन विषयाच्या अभ्यासाची आवश्यकता प्रतिपादन करीत असताना भारतीय इतिहास पाहता सिंधू संस्कृतीकालीन जीवन मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचेअसल्याचे दिसून येते या काळातील कुटुंबाचे नेतृत्व महिलांकडे होते त्या काळातील तुलनात्मक अभ्यास पाहतात सध्याच्या सद्यस्थितीत परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिलांचा सहभाग अभ्यासणे मला आवश्यक वाटते.

संशोधनाची उद्दिष्टे:

कोणताही संशोधक हा एखादा विषयसंशोधनासाठी निवडून त्या विषयावर चिंतन करतो या चिंतनातून उदयाला येणाऱ्या विचाराची मांडणी हे संशोधनाची उद्दिष्ट होत या अनुषंगाने माझा शोध प्रबंधाचा विषय "परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास"निवडला आहे व संशोधनाची उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे आहेत.

1) ७३ व्या व ७४व्या घटनादुरुस्तीतील महिलांच्या सहभाग विषयाच्या तरतुदीबाबत अभ्यास करणे.
2) परभणी जिल्ह्यातील राजकारणात स्थानिक ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग अभ्यासणे.
3) महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय कारकीर्द कालावधीत त्यांच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
4) परभणी जिल्ह्याच्या राजकारणात कोणत्या स्तरातून महिलांना कसे प्रतिनिधित्व मिळाले यांचे विश्लेषण करणे.
5) परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिलांचा राजकीय आरक्षणाबाबतच्या व राजकीय सहभागा बाबतस्थितीचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहीतके:

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके लक्षात घेतली आहेत.

1) परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिलांचा सक्रिय प्रभाव राहिलेला दिसून येतो.
2) परभणी जिल्ह्याच्या विकासात्मक बांधणी महिलांचा सहभाग दिसून येतो.
3)देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात परभणी जिल्ह्यातील महिलांचे प्रतिनिधित्वदिसून येते.
4) परभणी जिल्ह्याच्या सहकार चळवळीमध्ये महिलांचा सहभाग दिसून येतो.
5) परभणी जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतही महिलांचा सहभाग दिसून येतो.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या उद्देशानुसार प्राथमिक आणि द्वितीय तथ्यांचा साधनांचा वापर असल्यामुळे संशोधनात दोन्ही(साधनांचा) वापर करण्यात येणार असून त्यात तथ्य संकलन केले जाणारआहे.प्राथमिक साधनांचा संकलनासाठी मुलाखत अनुसूची प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादींचा वापर करून संशोधनासाठी आवश्यक ती माहिती मिळवली जाईल.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधन आराखडा मांडत असताना विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक आराखडा वापरण्यात येईल ज्यावेळी संशोधन कार्याचा उद्देश विशिष्ट जिल्हा व विशिष्ट घटक (महिला) भाग असतो.

अशावेळी राजकीय वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आराखडा उपयुक्त ठरतो.

मुलाखती:

राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून कोणत्याही विशिष्ट जिल्ह्याचा व घटकाची (महिला) माहिती घेत असताना वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते.त्या दृष्टिकोनातून संशोधनाचा एक भाग प्रश्नावलीच्या आधारे संबंधित व्यक्ती पदाधिकारी व त्यांच्या संबंधीच्या मुलाखती घेऊन मुलाखती मधून विषयाच्या अनुषंगाने मिळणारी माहिती उपयुक्त ठरते.

नमुना निवड:

”परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास”या विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार असून या जिल्ह्यातील महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या शोषणात नमुना निवड या तंत्राचा वापर केला जाईल त्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील संसदेतील लोकप्रतिनिधित्व राज्य विधिमंडळातील प्रतिनिधित्व स्थानिक स्वराज्य संस्थेतील जिल्हा परिषद महानगरपालिका नगरपालिका यांच्या काही विशिष्ट महिलांचा अभ्यास केला जाईल.

व्याप्ती व मर्यादा:

”परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभाग :एक अभ्यास”हा विषय संशोधनासाठी निवडलेला असताना भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा राजकीय सहभाग दिसून येत असला तरी मी माझ्या विषयासाठी परभणी जिल्हा हा प्रशासकीय प्रदेश निवडलेला असल्याने मला परभणी जिल्हा एवढाच विशिष्ट प्रदेश माझ्या कार्यक्षेत्राखाली असल्यामुळे मला संशोधनाच्या मर्यादा येतात तर परभणी जिल्हा ही माझी मर्यादा ठरवलेली आहे.

प्रकरणाची रूपरेषा:

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात भारतीय ऐतिहासिक राजकारणात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होते असे दिसून येते त्या काळातील स्त्रिया महत्त्वपूर्ण विषय संदर्भात निर्णय प्रक्रियेत सहभागी होत तसेच सद्यस्थितीत परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिलांचा सक्रिय सहभाग दिसून येतो व त्याही जिल्हा संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेताना दिसून येत आहेत त्यामुळे परभणी जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधी यांचा राजकीय सहभागाचा आढावा घेण्यात येणार आहे त्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी संशोधन पद्धती विषयाचे महत्त्व समस्या सूत्रं विषयाची आवश्यकता संशोधनाची

उद्दिष्टे संशोधनाची गृहीतके संशोधन आराखडा मुलाखती नमुना निवड व्याप्ती व मर्यादा इत्यादी संशोधनात्मक बाबींची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी याबाबत सविस्तर आढावा घेतला आहे पर्यटन स्थळे भौगोलिक परिस्थिती जिल्ह्याची सीमा क्षेत्रफळ हवामान प्रजन्यमान लोकसंख्या औद्योगीकरण राष्ट्रीय महामार्ग राष्ट्रीय संस्था सांस्कृतिक पार्श्वभूमी कृषी क्षेत्र शैक्षणिक विकास परभणी जिल्ह्याची आर्थिक स्थिती राजकीय संदर्भ इत्यादी बाबींचा विचार केलेला आहे.

प्रकरण तिसरे : परभणी जिल्ह्यातील राजकारणात महिला लोकप्रतिनिधी यांचा सहभाग व भूमिका

महाराष्ट्र राज्याचे निर्मितीपासून परभणी मराठवाड्यातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे.मराठवाड्याच्या मध्यभागी असलेल्या परभणी जिल्ह्याला अनेक लोकप्रतिनिधी महिलांचे प्रतिनिधित्व लाभले असल्याचे दिसून येते.त्यात मराठवाड्यातून महिलांमधून प्रथम राज्यसभेवर जाण्याचा मान माननीय फौजीया खान यांना मिळाला आहे तसेच त्यांनी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्य विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहातही केलेले आहे.तसेच मीराताई रेंगे,मेघनाताई बोर्डीकर यांनी राज्य विधिमंडळात प्रतिनिधित्व केले व करीत आहेत.त्यासोबतच महानगरपालिकेचे महापौरपदी मीनाताई वरपूडकर, अनीता सोनकांबळे ,संगीता वाडकर ई.अशा अनेक प्रकारच्या महत्त्वपूर्ण पदावर परभणी जिल्ह्याच्या महिलांनी आपली कारकीर्द पार पाडली आहे.असे दिसून येते अशा परभणी जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी म्हणून नेतृत्व केलेल्या महिलांचा परभणी जिल्ह्यातील राजकीय सहभागाचा अभ्यास या प्रकरणात करणार आहोत.

प्रकरण चौथे: राजकीय सहभागातून महिलांचा सामाजिक आर्थिक स्थितीत झालेला बदल

प्रस्तुत प्रकरणामध्ये नमुना प्रश्नावलीच्या आधारे परभणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी राजकीय व्यवस्थेत १९९९ते २०२४या कालखंडातील सहभागी महिलांची महिला आरक्षण व धोरणविषयक माहिती ,प्रशासकीय कामकाजासंबंधी माहिती, राजकीय माहिती, सामाजिक उपक्रमाविषयी माहिती,कौटुंबिक व आर्थिक माहिती तसेच जीवन परिचय इ.माहिती याबाबतचे विवेचन करणार आहे.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष

या प्रकरणात संशोधन व अभ्यासातून निघालेला निष्कर्ष दिला जाणार आहे.

टीप:

वरील प्रमाणे शोध प्रबंधाचा प्राथमिक आराखडा असून आवश्यकता असल्यास त्यात काही बदल केला जाऊ शकतो.

संदर्भ सूची :

1) देशमुख रा.नी.आपला परभणी जिल्हा,कल्पना प्रकाशन नांदेड ,२०११.

2) साळुंखे आ.ह.हिंदू संस्कृती आणि स्त्री,लोकवाङ:मय गृह,मुंबई,१९९३.

3) भागवत विधूत,स्त्री प्रश्नाची वाटचाल,प्रतिमा प्रकाशन,पुणे २००४.

4) पवार उर्मिला,मु.न.मीनाक्षी,आम्ही इतिहास घडवला,सुगावा प्रकाशन,पुणे २०००.

5) दाभोलकर कुंदा,भारतीय स्त्री-शिक्षण :विकास व वाटचाल,जोशी –लोखंडे प्रकाशन,पुणे १९७३.

6) चौधरी अशोक,महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१,चौधरी लॉ प्रकाशन,पुणे,२००५.

7) पंचायतीराजसंदर्भ - पंचायत राज का विकास और संविधान (७३वा संशोधन)

8) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थासंदर्भ–नागरी स्थानिक स्वराज्यसंस्था आणि संविधान (७४ वे संशोधन)

9) भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे,महाराष्ट्र विद्यापीठग्रंथ निर्मितीसाठी ,तिसरी आवृत्ती ,१९८७.

10) आगलावे प्रदीप -भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती जुलै –२००३.

11) पाटील वां.बा- संशोधन पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,प्रथम आवृत्ती,१९९८.

12) कश्यप सुभाष -आमची संसद, नॅशनल बुक टस्ट इंडिया,२०१३.

13) सिरसिकर व .म.,आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण,कॉन्टिनेन्टलप्रकाशन,पुणे २००४.

14) कुमार सीमा,महिला अधिकार और भारतीय प्रावधान,उपकार प्रकाशन,आग्रा ,२००५.

15) विध्या कुलकर्णी,राज्यसत्तेच्या कारभारनी महिला,राजसत्ता आंदोलन विशेषांक,मुंबई २००१

16) Gandhi on Women . New Delhi : Navjivan Press.

17) Devi Laxmi 1998.Women in Politics Management and Decision-Making Process.New Delhi:Anoml Publications.